# -:प्रेस नोट:-

## तलाठी कार्यालय साजा, क्र. ४ नागाळा, ता. जि. चंद्रपूर येथील तलाठी श्रीमती प्रणाली अनिलकुमार तुंडुरवार यांचे विरुध्द ॲन्टी करप्शन ब्युरो चंद्रपूर ची कारवाई

तलाठी कार्यालय साजा. क्र. ४ नागाळा, ता. जि. चंद्रपूर येथील तलाठी श्रीमती प्रणाली अनिलकुमार तुंडुरवार यांचे विरूध्द ५०००/– रूपये मागणी करून तडजोडीअंती ४०००/– रू. स्विकारल्या संबंधाने ॲन्टी करप्शन ब्युरो चंद्रपूर यांचे पथकाने आज रोजी कार्यवाही केली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, यातील तक्रारदार हे मौजा सिदुर, पो. पिपरी (धानोरा), ता. जि. चंद्रपूर येथील रहीवासी असुन शेतकरी आहेत. तक्रारदार यांचे वडीलांनी त्यांचे नावे असलेली मौजा सिदुर, पो. पिपरी (धानोरा), ता. जि. चंद्रपूर येथील शेतजमीन तक्रारदार व तक्रारदार यांच्या पत्नीचे आणि तक्रारदार यांचे मुलाचे नावे बक्षिसपत्र करुन दिले होते. सदर बक्षिसपत्र करून दिलेली शेतीचे फेरफार करण्याचे कामाकरीता तक्रारदार हे मौजा नागाळा येथील तलाठी कार्यालय येथे जाऊन तलाठी श्रीमती प्रणाली अनिलकुमार तुंडुरवार यांचेकडे अर्ज केला होता. तक्रारदार हे काही दिवसानंतर सदर अर्जाची चौकशी करण्याकरीता तलाठी कार्यालय नागाळा येथे गेले असता तलाठी श्रीमती प्रणाली अनिलकुमार तुंडुरवार यांनी फेरफार करून सातबारा उतारे तयार करून देण्याचे कामाकरीता ५०००/– रूपयाची मागणी केली होती. परंतु तक्रारदार यांना तलाठी श्रीमती प्रणाली अनिलकुमार तुंडुरवार यांस लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर येथील अधिकाऱ्यांना भेटुन तक्रार नोंदविली.

प्राप्त तक्रारीवरून आज दिनांक ०७/०३/२०२४ रोजी पोलीस निरीक्षक श्री. प्रशांत पाटील यांनी तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीची गोपनीयरित्या शहानिशा करून पडताळणी/सापळा कारवाईचे आयोजन केले. त्यामध्ये पडताळणी कार्यवाहीदरम्यान तलाठी श्रीमती प्रणाली अनिलकुमार तुंडुरवार यांनी शेतीचे फेरफार करून सातबारा उतारे तयार करून देण्याचे कामाकरीता तडजोडीअंती ४०००/–रू लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यावरून तलाठी कार्यालय साजा क्र. ४ नागाळा, ता. जि. चंद्रपूर येथे पंचासमक्ष कार्यवाहीदरम्यान महिला आ.लो.से. श्रीमती प्रणाली अनिलकुमार तुंडुरवार, तलाठी, तलाठी कार्यालय नागाळा यांना ४०००/– रूपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले असुन पुढील तपास कार्य सुरू आहे.

सदरची कार्यवाहीश्री. राहुल माकणीकर,पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर, श्री. संजय पुरंदरे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर तसेच श्रीमती मंजुषा भोसले, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक प्रशांत पाटील, पोहवा. हिवराज नेवारे, नापोशि रोशन चांदेकर, पो.अ. वैभव गाडगे, अमोल सिडाम, प्रदीप ताडाम, म.पो.अ. पुष्पा काचोळे सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर व चा.पो.अ. रामेश्वर पाल मो.प. वि. चंद्रपूर यांनी यशस्वी पार पाडली आहे. हॅश व्हॅल्यु घेण्यात आलेली आहे.

सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की,त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (एजेंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ आमचेशी संपर्क साधावा.

- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय नागपूर दुरध्वनी कमांक :– ०७१२–२५६१५२०
  श्री. राहुल माकणीकर, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर
  श्री. संजय पुरंदरे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर

- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक :– ०७१७२–२५०२५१
  टोल फ्रि क्रमांक :– १०६४
  श्रीमती मंजुषा भोसले, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :– ९३२२२५३३७२
  श्री. प्रशांत पाटील, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :– ९९३०५५६९६१
  श्री. जितेंद्र गुरनुले, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :– ८८८८८५७१८४

Website: www.acbmaharashtra.gov.in

(प्रशांत पाटील)
पोलीस निरीक्षक
लाच लुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर

Scanned with OKEN Scanner